आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.५७

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – ज्ञानदेव बबन निघुट

वय – ६७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार–वडझीरे, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>**–

आरोपी सेंट्रल बँक, शाखा वडझीरे येथे कामाला असल्याने मी त्याला ओळखतो. माझे त्या बँकेत सेव्हींग्ज खाते आहे. ते खाते सन २०१७ साली चालु केले. माझा खाते क्र.३५९५३९६६७१ असा आहे. माझ्या व्यतीरिक्त अजुन ब–याच लोकांचे तेथे खाते आहे. दि.३१/१२/२०२० साली मी रु.४,५०,०००/–माझ्या सेव्हींग्ज खात्यात सेंट्रल बँक शाखा वडझीरे येथे जमा केले होते. ते पैसे मी माझ्या एफ.डी.मधुन खात्यात जमा केले होते. मी दि.२/१/२०२१ रोजी सदर बँकेत गेलो व दोन लाखाची एफ.डी.केली. त्याबाबत मी गौतम जाधव यास भेटलो. त्यानंतर दि.६/१/२०२१ रोजी मी अडीच लाखाची एफ.डी. केली. त्यावेळेसही मी गौतम जाधव यास भेटलो होतो. त्याने चेकवर माझ्याकडुन दोन चार सहया करुन घेतल्या. दि.२ तारखेनंतर मला दोन लाख रुपये डेबीट झाल्याचा माझ्या मोबाईलवर मेसेज आला. त्यानंतर दुसरा चेक जमा केल्यानंतर माझ्या मोबाईलवर अडीच लाख रुपये डेबीट झाल्याचा मेसेज आला. मी गौतम जाधवयास त्याबाबत पावती मागितली असता त्याने दोन दिवसानंतर यायला सांगितले. दोन दिवसांनी मी गेल्यावर गौतम जाधवने मला दोन लाखाचे एक सर्टीफिकेट व अडीच लाखाचे एक सर्टीफिकेट दिले. ते घेवुन मी घरी ठेवुन दिले. माझा ११ फेब्रुवारी रोजी सौदा असल्याने मी दि.१६ फेब्रुवारी रोजी गौतम जाधव यास एफ डी मोडायची असल्याने माझ्याकडील सर्टीफिकेट दिले. त्याने इंटरनेट नाही, कॅश नाही असे कारण सांगुन मला उद्या या असे सांगितले. त्यानंतर बँकेच्या मॅनेजरचा मला दि.१७ किंवा १८ तारखेला फोन आला की तुमची बँकेत एफ डी नाही. मी मॅनेजरला सांगितले की मी त्याला सर्टीफिकेट दिले होते. मला मॅनेजरने बँकेत जावुन त्याच्याकडुन पैसे घ्यायला

सांगितले. मी बँकेत जावुन ३/४ तास त्याची वाट बघीतली पण तो निघुन गेला. तो सोमवारी बँकेत एकदा आला होता.त्यानंतर मी त्याला फोन केला मात्र त्यानंतर त्याने फोन बंद केला व त्यानंतर तो बँकेत आला नाही. दि.२३/२ रोजी मी सेंट्रल बँक येथे माझी फसवणुक झाल्याबाबत ऑनलाईन तक्रार दिली. त्यानंतर वडझीरे बॅक शाखेतही मी माझी फसवणुक झाल्याबाबत अर्ज दिला व त्याची एक प्रत नागापुर शाखेत दिली. आता मला मी दिलेला अर्ज दाखवण्यात आला. तो मी टाईप केला होता. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.५८ देण्यात येतो. पोलीसांनी मला दि.२७/३/२०२१ रोजी माझी फसवणुक झाल्याबाबत बोलावले होते व माझा त्यांनी जबाब घेतला. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

<u>**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः**</u>

पोलीसांसमोरील माझा दि.२७/३/२०२१ रोजीचा जबाब मी वाचला होता. मी एम टी एन एल मध्ये कामास होतो. हे म्हणणे खरे आहे की माझे बँकेतील खाते मी ठाणे येथे ओपन केले होते. हे म्हणणे खरे आहे की मला बँकेतील व्यवहार ब–यापैकी कळतात. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी बँकेत एफडी करायला गेलो त्यावेळी गौतम जाधवसोबत इतर बँकेतील कर्मचारी उपस्थित होते. हे मला माहीत नाही की गौतम जाधव बँकेत बँक मित्र म्हणुन काम करतो. हे म्हणणे खरे आहे की बँकेत गेल्यावर बँकेतील पैसे भरण्याचे किंवा पैसे काढण्याचे काम कॅशीयर करतो. हे म्हणणे खरे आहे की दि.६ मार्च २०२१ रोजीच्या अर्जात मी बँकेत कॅशीयर प्रकाश बोरुडे असल्याचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की दि.६/३/२०२१ रोजीच्याशाखाधिकारी यांना दिलेल्या अर्जात माझी विद्या मॅडम, कॅशीयर बोरुडे व मॅनेजर उघडे यांनी फसवणुक केल्याचे मी नमुद केले आहे.

प्रश्न– तुमच्या पोलीसांसमोरील जबाबात तुमची विद्या मॅडम, कॅशीयर बोरुडे व मॅनेजर उघडे यांनी फसवणुक केल्याचे नमुद नाही व ते का नमुद नाही याचे कारण तुम्हाला सांगता येईल का?

उत्तर– मी पोलीसांना ते सांगितले होते मात्र ते माझ्या जबाबात नाही.

हे म्हणणे खरे आहे की विद्या मॅडम, कॅशीयर बोरुडे व मॅनेजर उघडे यांनी

सुध्दा संगनमत करुन माझी फसवणुक केली आहे. हे म्हणणे खरे आहे की गौतम जाधवने मला दिलेल्या २ सर्टीफिकेटवर कोणी सही केली व कशी सही केली याबाबत मला माहीती नाही.

प्रश्न– बँकेत तुम्ही मॅनेजरशी भेटताना तुम्हाला मॅनेजरने गौतम जाधवने दि.२३/१०/२०२० रोजी राजीनामा दिल्याचे कळवले होते का?

उत्तर– नाही. याबाबत मला माहीत नाही.

ज्यावेळेस मी एफडी करण्यासाठी बँकेत गेलो त्यावेळेस कॅशीयरने किंवा मॅनेजरने मला सदर राजीनाम्याबाबत सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी जे पैसे बँकेत भरले होते ते पैसे मला परत बँकेने दिले. ते पैसे मला कॅश स्वरुपात भेटले नव्हते. ते खात्यावर जमा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी बँकेत अर्ज दिला त्यावेळेस बँक अधिकारी यांनी मला बोलावुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर माझी व बँक मॅनेजरची या विषयावर चर्चा झाली. हे म्हणणे खरे आहे की कॅशीयर बोरुडे व मॅनेजर उघडे हे देखील मला भेटले होते.

प्रश्न– ही भेट झाल्यानंतर बँकेने तुमचे पैसे तुम्हाला परत दिले?

उत्तर– होय, १० महीन्यांनी मला पैसे दिले.

पोलीसांकडे दि.२७/३/२०२१ रोजी जबाब दिल्यानंतर त्याच्या ५/६ महीन्यानंतर मला पैसे मिळाले. हे म्हणणे खरे नाही की ज्यावेळी मी बँकेत पैसे मागण्यासाठी गेलो त्यावेळी मी गौतम जाधवकडुन कॅश स्वरुपात एक लाख रुपये स्विकारले.

प्रश्न– बँक अधिका–यांशी तुम्ही भेटल्यानंतर त्यांनी तुम्हाला तुमच्या एफडी मधील रकमेपेक्षा जास्त पैसे दिले?

उत्तर– त्यांनी मला एफडी वरील रकमेवर साधे व्याज दराने पैसे दिले.

प्रश्न– तुम्हाला दिलेले सर्टीफिकेट तुम्ही पोलीसांना दिले होते का?

उत्तर– मी बँकेत गौतम जाधवला सर्टीफिकेटस दिले होते.

हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी बँकेत पावत्या दिल्या त्यावेळेस प्रकाश बोरुडे व मॅनेजर बँकेतच होते. हे म्हणणे खरे आहे की मी ई–मेल केल्यानंतर बँकेबाहेर पैसे मिळण्यासाठी मोठे आंदोलन केले होते व त्यावेळी माझ्यासोबत तुकाराम कोंडीबा तिकोणे हे देखील होते. हे म्हणणे खरे आहे की बँकेने गौतम जाधव

बँकेत कामाला नसल्याबाबत बोर्ड लावला होता. मी सांगतो की मार्चनंतर लावला होता. माझ्या बँक खात्यास माझा मोबाईल नंबर लींक आहे. मी टेलीकॉममध्ये कामास असल्याने मला त्याबाबत चांगली माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की अकाउंटबाबत कोणताही व्यवहार झाला तर त्याबाबत मोबाईलवर मेसेज येतो. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी बँक अधिका–यांना भेटलो व त्यांनी मला वाढीव रक्कम देण्याचे सांगितले त्यानंतर मी दि.२७/३/२०२१ रोजी आरोपी गौतम जाधव विरोधात फक्त जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की मी वाढीव रक्कम घेवुन व बँक अधिका–यांचे ऐकुन आरोपीविरोधात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला माझे पैसे मिळाले असल्याने माझी आरोपीविरोधात तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की ज्यावेळेस बँकेतुन पैसे विथड्रॉ झाले त्यावेळी मी बँकेत हजर होतो.

प्रश्न– ज्यावेळेस तुम्हाला मोबाईलवर पैसे विथड्रॉ झाल्याबाबत मेसेज आला त्यावेळेस तुम्ही बँकेत तक्रार द्यायला गेले नाही

उत्तर– माझी एफडी झाली होती.

हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी पोलीसांच्या व बँक अधिका–यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १९/०९/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.